देशोन्नती

# मूल्यगर्भ पुस्तकाने आत्मभान येते : डॉ. मिलिंद कांबळे



**देशोन्नती वृत्तसंकलन**

**वर्धा** : समुद्रपूरः विद्यार्थ्यांनो, वाचाल तर वाचाल अशी एक म्हण आहे. आणि ती खरी आहे कारण जगातल्या चांगल्या चांगल्या पुस्तकांनी माणसाच्या मनाची आणि मेंदूची मशागत केली आहे. आणि अशी मशागत झालेला मेंदू समाज घडवत असतो ,समाजाला विकसित करत असतो, पर्यायाने माणूस विकसित होत असतो. यासाठी ग्रंथ वाचले पाहिजेत कारण ग्रंथामुळे माणसाच्या जीवनामध्ये परिवर्तन घडत असते, क्रांती घडत असते. आणि ही क्रांती नव समाज निर्माण करत असते. जगामध्ये अनेक चळवळी व क्रांत्या संपलेल्या आहेत पण पुस्तक रुपी प्रबोधनाची क्रांती कधीच न संपणारी आहे, म्हणून विद्यार्थी मित्रांनो, माणसाला पुस्तकांमुळे आत्मभान येते स्व ची ओळख होते ,ही ओळख माणसाला माणूसपणाची जाणीव करून देत असते म्हणून पुस्तके आपण वाचली पाहिजेत असे विचार डॉ. मिलिंद कांबळे यांनी व्यक्त केले.

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा दिनानिमित्त विद्या विकास महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शनी चे आयोजन करण्यात आले होते.

या ग्रंथ प्रदर्शनी कार्यक्रमाचे प्रमुख विद्या विकास महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख डॉ. मिलिंद कांबळे होते तर अध्यक्षस्थानी डॉ. प्रकाश तळे होते तसेच प्रमुख उपस्थिती कनिष्ठ मराठी विभागाचे प्रा. किशोर घाटुर्ले प्रा. मनोज बावने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा मनोज बावणे यांनी केले. त्यांनी प्रस्ताविकेतून मराठी भाषा संवर्धन पंधरवडा का साजरा केला यावर विचार मांडले डॉ. मिलिंद कांबळे यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथ प्रदर्शनीमध्ये पुस्तकांचे महत्त्व सांगितले.


त्याचबरोबर मराठी भाषापंधरवडा दिन साजरा करण्यापाठीमागे महाराष्ट्र शासनाचा हेतू काय आहे याबद्दलही त्यांनी विचार व्यक्त केले .या दिनानिमित्त मराठी भाषेसंबंधी परिसंवाद, व्याख्याने, कार्यशाळा, शिबिरे ,कवी संमेलने, एकांकिका, बालनाट्य, नाटके ,पुस्तक प्रकाशन, प्रश्नमंजुषा ,कथाकथन, चारोळी लेखन, कथालेखन, कविता लेखन ,हस्ताक्षर, शुद्धलेखन . वकृत्व, घोषवाक्य, अभिवाचन, वादविवाद ,अंतरक्षरी, शब्दकोडे, रसग्रहण इत्यादी उपक्रम या दिनानिमित्त राबविणे ही काळाची गरज आहे आणि हेच या पंधरवड्या निमित्त आपणास करायचे आहे असे विचार डॉ. मिलिंद कांबळे त्यांनी या ठिकाणी व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश तळे यांनी मराठी भाषा आणि आजचा विद्यार्थी यावर सविस्तर विवेचन केले .

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. किशोर घाटुर्ले यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार सुरेश शेलकर यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यातील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. स्मिता काळे ,राजूभाऊ तुळसकर, तनु मसराम, आदिती भोयर, विशाल भगत ,आकांक्षा आटोले, आकाश पाटील, इत्यादी विद्यार्थ्यांनी या ग्रंथप्रदर्शनी निमित्त ग्रंथालयात उपस्थिती दर्शविली. तालुका प्रतिनिधी

Wardha Edition
Jan 17, 2025 Page No. 8
Powered by: erelego.com

SCAN AnyScanner

# मूल्यगर्भ पुस्तकाने आत्मभान येते : डॉ. मिलिंद कांबळे



**देशोन्नती वृत्तसंकलन**

**वर्धा** : समुद्रपूरः विद्यार्थ्यांनो, वाचाल तर वाचाल अशी एक म्हण आहे. आणि ती खरी आहे कारण जगातल्या चांगल्या चांगल्या पुस्तकांनी माणसाच्या मनाची आणि मेंदूची मशागत केली आहे. आणि अशी मशागत झालेला मेंदू समाज घडवत असतो ,समाजाला विकसित करत असतो, पर्यायाने माणूस विकसित होत असतो. यासाठी ग्रंथ वाचले पाहिजेत कारण ग्रंथामुळे माणसाच्या जीवनामध्ये परिवर्तन घडत असते, क्रांती घडत असते. आणि ही क्रांती नव समाज निर्माण करत असते. जगामध्ये अनेक चळवळी व क्रांत्या संपलेल्या आहेत पण पुस्तक रुपी प्रबोधनाची क्रांती कधीच न संपणारी आहे, म्हणून विद्यार्थी मित्रांनो, माणसाला पुस्तकांमुळे आत्मभान येते स्व ची ओळख होते ,ही ओळख माणसाला माणूसपणाची जाणीव करून देत असते म्हणून पुस्तके आपण वाचली पाहिजेत असे विचार डॉ. मिलिंद कांबळे यांनी व्यक्त केले.

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा दिनानिमित्त विद्या विकास महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शनी चे आयोजन करण्यात आले होते.

या ग्रंथ प्रदर्शनी कार्यक्रमाचे प्रमुख विद्या विकास महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख डॉ. मिलिंद कांबळे होते तर अध्यक्षस्थानी डॉ. प्रकाश तळे होते तसेच प्रमुख उपस्थिती कनिष्ठ मराठी विभागाचे प्रा. किशोर घाटुर्ले प्रा. मनोज बावने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा मनोज बावणे यांनी केले. त्यांनी प्रस्ताविकेतून मराठी भाषा संवर्धन पंधरवडा का साजरा केला यावर विचार मांडले डॉ. मिलिंद कांबळे यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथ प्रदर्शनीमध्ये पुस्तकांचे महत्त्व सांगितले.

त्याचबरोबर मराठी भाषापंधरवडा दिन साजरा करण्यापाठीमागे महाराष्ट्र शासनाचा हेतू काय आहे याबद्दलही त्यांनी विचार व्यक्त केले .या दिनानिमित्त मराठी भाषेसंबंधी परिसंवाद, व्याख्याने, कार्यशाळा, शिबिरे ,कवी संमेलने, एकांकिका, बालनाट्य, नाटके ,पुस्तक प्रकाशन, प्रश्नमंजुषा ,कथाकथन, चारोळी लेखन, कथालेखन, कविता लेखन ,हस्ताक्षर, शुद्धलेखन , वकृत्व, घोषवाक्य, अभिवाचन, वादविवाद ,अंतरक्षरी, शब्दकोडे, रसग्रहण इत्यादी उपक्रम या दिनानिमित्त राबविणे ही काळाची गरज आहे आणि हेच या पंधरवड्या निमित्त आपणास करायचे आहे असे विचार डॉ. मिलिंद कांबळे त्यांनी या ठिकाणी व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश तळे यांनी मराठी भाषा आणि आजचा विद्यार्थी यावर सविस्तर विवेचन केले .

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. किशोर घाटुर्ले यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार सुरेश शेलकर यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यातील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. स्मिता काळे ,राजूभाऊ तुळसकर, तनु मसराम, आदिती भोयर, विशाल भगत ,आकांक्षा आटोले, आकाश पाटील, इत्यादी विद्यार्थ्यांनी या ग्रंथप्रदर्शनी निमित्त ग्रंथालयात उपस्थिती दर्शविली. तालुका प्रतिनिधी

AnyScanner